# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,
सेनापती बापट मार्ग,प्रभादेवी रेल्वेस्टेशन जवळ, मुंबई-१३.
दूरध्वनी क्र.०२२-६९३२८११७ ईमेल: mlwbprog@gmail.com


जा.क्र.मका/कार्यक्रम/२०२५/ ४८७ दिनांक:०९/१०/२०२५

परिपत्रक

**विषय :- १६ वा औद्योगिक व व्यावसायिक कामगारांसाठी नाट्य महोत्सव सन २०२५-२६**

संदर्भ :- मका/कार्यक्रम/२०२५/६७१ दिनांक १५.०७.२०२५

## -: उद्देश व स्वरुप :-

सन १९५३ पासुन अखंडपणे सुरु असलेली कामगार नाट्य स्पर्धा हि महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धा व इतर नाट्य स्पर्धा पेक्षाही जुनी आहे. नाट्य स्पर्धेला मिळणारा प्रतिसाद विचारात घेऊन औद्योगिक व व्यावसायिक कामगारांसाठी मंडळाने सन २००६ पासुन स्वतंत्र नाट्य स्पर्धा आयोजित करण्याचा निर्णय घेतला. या राज्यस्तरीय नाट्य स्पर्धेमध्ये कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत येत असलेले उद्योग आणि आस्थापना यांच्या नाट्य संघांना सहभागी होता येते.

## -: प्रस्तावना :-

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील औद्योगिक व व्यावसायिक कामगारांची १६ वी नाट्य स्पर्धा दिनांक **२१ जानेवारी, २०२६ ते १८ फेब्रुवारी, २०२६** या कालावधीत नाशिक विभागात **परशुराम साईखेडकर नाट्यगृह, नाशिक** येथे आयोजित करण्यात येणार आहे.

## स्पर्धेचे नियम व अटी

१. मंडळाचे नाट्य स्पर्धेचे नियम व अटी यापुर्वी प्रकाशित करण्यात आलेल्या आहेत. सदर नियम अटी मंडळाच्या संदर्भ पुस्तिकेत देखील प्रकाशित करण्यात आलेल्या आहेत त्या सर्व नियम अटी या स्पर्धेसाठी लागू राहतील.

२. नाटकात भूमिका करणारे सर्व कलावंत हे मुंबई कामगार कल्याण निधी १९५३ च्या कक्षेत येणारे कामगार अथवा कर्मचारी असलेच पाहिजेत. तेच कामगार स्पर्धेत भाग घेऊ शकतील.

३. एका आस्थापनेच्या नावाने एकच संघ सहभागी करुन घेता येईल. एकाच आस्थापनेचे अनेक कामगार एकत्र आले असतील तर त्यांनी आपापसात संमतीने ठरविलेल्या एकाच संघास सहभागी करुन घेता येईल.

४. नाट्य संघानी आपल्या प्रवेशिका कामगार कल्याण अधिकारी यांच्या मार्फतच पाठवाव्यात.

५. स्पर्धा सायंकाळी ७.०० नंतरच घेण्यात येतील.

६. प्रवेशिके सोबत कामगार कल्याण निधी कपात केल्याचा माहे डिसेंबर २०२४/जून २०२५ चा वेतनाचा दाखला अथवा या बाबतीत लिन नंबरसह आस्थापनेचा दाखला जोडण्यात यावा. त्या शिवाय नाट्य संघास प्रवेश देता येणार नाही.

७. नाट्य संघाकडून प्रवेशिके सोबत स्पर्धेची प्रवेश फी म्हणून रू.३००/- व अनामत रु.५०००/- घेण्यात यावी. तसेच ही रक्कम मंडळात जमा करून घेऊन त्याची पावती नाट्यसंस्थेला द्यावी.

८. स्पर्धेत भाग घेणाऱ्या नाट्यसंस्थेने नाटकासाठी अनामत म्हणून भरलेली रक्कम नाटक सादर केल्यावर परत मिळविण्यासाठी भरलेल्या अनामत रकमेची मुळ पावती अर्जासोबत/ मागणी पत्रासोबत जोडणे आवश्यक राहील. तसेच ज्या केद्रातून प्रवेशिका प्राप्त झाली असेल त्याच केंद्राच्या मार्फत अनामत रक्कमेचे मागणी केलेले पत्र संस्थेला सादर करावे लागेल. मागणी केल्यानंतर (मका/कार्यक्रम/२०२३/६३३ दिनांक ४-०९-२०२३) अन्वये विभागस्तरावरुन अनामत रक्कम परत करण्यास कायमस्वरुपी मान्यता दिल्यानुसार कार्यवाही करावी. प्रवेश फी ची रक्कम देऊ नये ती कायम स्वरूपी मंडळात जमा राहिल.

९. स्पर्धेत भाग घेणाऱ्या नाट्य संघास रंगभूमी परिक्षण मंडळाचे प्रमाणपत्र व लेखकाची परवानगी सादर करावी लागेल, त्याशिवाय नाटक सादर करता येणार नाही.

१०. औद्योगिक नाट्य महोत्सवात भाग घेणारे नाट्यसंघ मंडळाच्या विभाग स्तरावरील प्राथमिक नाट्य महोत्सवात भाग घेऊ शकणार नाहीत.

११. नाट्य स्पर्धेत संघाची निवड होऊनही दिलेल्या तारखेस/वेळेत नाटक सादर न केल्यास संस्थेला/ आस्थापनेला त्यांनी भरलेली अनामत रक्कम परत केली जाणार नाही.

१२. नाट्य संस्थाना नाटकातील पात्राच्या संपुर्ण नांवाची भूमिकेसह यादी आणि ज्या व्यवस्थापनेत काम करतात त्या व्यवस्थापनेचा दाखला सादर करावा लागेल.

१३. मध्यांतरासह नाटक दोन तासापेक्षा कमी व तीन तासांपेक्षा अधिक असू नये.

१४. नाट्य महोत्सवात सहभागी संघानी आपल्या प्रवेश अर्जासोबत स्पर्धेत सादर करावयाच्या नाट्यसंहितेच्या सुवाच्य अक्षरात दोन प्रती देणे आवश्यक राहील.

१५. नाट्य स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या संघास जर मंडळाने पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी नाटक सादर करण्यास सांगितल्यास तो प्रयोग करणे संघास बंधनकारक राहील.

१६. नाटकात काम करणारे कलावंत हे हौशी कलाकार असले पाहिजेत जो कलाकार स्वतःच्या उपजिविकेसाठी मुख्यतः नाटक, दुरदर्शन किंवा चित्रपटातील भूमिकेच्या मिळणाऱ्या भूमिकावर अवलंबुन नसेल यास हौशी कलाकार मानता येईल. ज्या कलाकारांनी नाटक, दुरदर्शन किंवा चित्रपट संस्थेस वेतन पध्दतीवर १०० पेक्षा अधिक प्रयोगात काम केलेले असेल त्यास हौशी कलाकार मानण्यात येणार नाही.

१७. प्रवेशिकेत पसंतीच्या क्रमानुसार तीन नाटकाची नांवे द्यावीत. पहिले अथवा दुसरे नाटक स्विकारले गेले नाही तर तिसरे नाटक विचारात घेतले जाईल. जे नाटक निवडले जाईल तेच नाटक संस्थेला सादर करावे लागेल.

१८. नाटकाची कालमर्यादा तिसऱ्या घंटेपासुन शेवटच्या अंकाचा पडदा पडेपर्यंत धरण्यात येईल.

१९. एखाद्या कलाकारास काही आकस्मिक घटनेमुळे नाटकात काम करणे अशक्य झाले तर मा.कल्याण आयुक्तांच्या लेखी पुर्व परवानगी शिवाय नवीन कलाकारास स्पर्धेत भाग घेता येणार नाही. मा.कल्याण आयुक्तांच्या पूर्व परवानगी शिवाय जर एखाद्या नवीन कलाकाराने स्पर्धेत भाग घेतल्याचे निदर्शास आले तर सदर नाटक स्पर्धेतून बाद करण्यात येईल.

२०. मंडळाकडून नाट्य स्पर्धेसाठी तज्ञ व अनुभवी परिक्षकांची नियुक्ती केली जाईल. काही अपरिहार्य कारणामुळे जर एखादा परिक्षक स्पर्धेसाठी गैरहजर असेल तर हजर असलेल्या परिक्षकांनी दिलेल्या गुणांची सरासरी काढुन ती सरासरी गैरहजर असणाऱ्या परिक्षकाचे गुण मानले जातील.

२१. कोणतेही कारण न देता आपल्या अधिकारात मंडळ एखाद्या नाटयसंघास,संस्थेस प्रवेश नाकारु शकेल. परंतु अशावेळी त्या संघाने/संस्थेने भरलेली प्रवेश फी रू.३००/- व अनामत रक्कम रू.५०००/- सदर संस्थेस परत केली जाईल.

२२. मंडळाच्या नियमाप्रमाणे स्पर्धेत सहभागी होणाऱ्या नाट्य संघाना सादरीकरण खर्च रु.७५००/- व नाट्यस्पर्धेत भाग घेणारे कलांवत अधिक ४ साथीदार मिळून जास्तीत जास्त २० कलावंताना कमीत कमी दराचा प्रवासखर्च व प्रति कलावंत प्रतिदिन दैनिक भत्ता रु.२००/- प्रमाणे दिला जाईल.

२३. नाट्य स्पर्धेसाठी १ दर्शनी पडदा, १ फ्लॅटसीन सेट, काळा पडदा, सर्व साधारणपणे विजेचे दिवे, ६ स्पॉट, डिमर, १ सोफासेट, टिपॉय व ध्वनीक्षेपण व्यवस्था मंडळाकडून करण्यात येईल. या व्यतिरीक्त लागणाऱ्या साधनसामुग्रीची व्यवस्था सदर संघास करावी लागेल.

२४. मागील वर्षी ज्या कंपनीच्या नाट्य संघानी अनामत रक्कम मंडळाकडे भरली असेल आणि ती त्यांनी परत घेतली नसेल अशा नाट्यसंघानी चालु आर्थिक वर्षात नाट्य स्पर्धेसाठी प्रवेशिका सादर केल्या असतील अशा संघाची मंडळात जमा असलेली अनामत रक्कम ग्राह्य मानण्यात यावी. परंतु त्यांच्याकडून स्पर्धेची प्रवेश फी नव्याने घ्यावी.

२५. ज्या ठिकाणी ही स्पर्धा होईल त्या ठिकाणच्या संबंधित विभागाचे सहायक कल्याण आयुक्त यांनी स्पर्धेतील सहभागी झालेल्या सर्व संघातील कलावंताना मंडळाच्या नियमानुसार दैनिक भत्ता व प्रवास खर्चाची रक्कम नाट्य संघाना स्पर्धेच्या ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी खर्चाच्या प्रस्तावात मागणी करावी त्यासाठी त्यांना स्पर्धेत सहभागी झालेल्या नाट्यसंघाच्या प्रवेशिकेची एक झेरॉक्स मंजुरीपत्रकासोबत मध्यवर्ती कार्यालयाकडून उपलब्ध करून दिली जाईल.

२६. केंद्र प्रमुख यांनी आपल्याकडे प्राप्त झालेल्या प्रवेशिका आपल्या गटाच्या कामगार कल्याण अधिकारी यांना सादर कराव्यात व त्यांनी प्रवेशिका योग्य असल्याची खात्री करून घ्यावी. त्यानंतरच केंद्र प्रमुखांनी प्रवेश फी व अनामत रक्कमेची पावती फाडून सदर प्रवेशिका गटाकडे दिनांक १ डिसेंबर, २०२५ पर्यंत पाठव्यावात. गट प्रमुखांनी प्रवेशिका स्विकारुन त्या दिनांक १० डिसेंबर, २०२५ पर्यंत विभागीय कार्यालय येथे पाठवाव्यात. विभाग प्रमुखांनी संबंधित गटाकडून प्राप्त झालेल्या प्रवेशिका एकत्रित करून एक संच तयार करावा व आपल्या अभिप्रायासह दिनांक २२ डिसेंबर, २०२५ पर्यंत मध्यवर्ती कार्यालयास पाठवाव्यात.

२७. औद्योगिक व व्यावसायिक कामगारांच्या नाट्य स्पर्धेत विजेत्या संघाना खालीलप्रमाणे बक्षिसे देण्यात येतील.

## पारितोषिके

| क्रमांक | प्रथम | द्वितीय | तृतीय | एकूण मंजूरी |
|---|---|---|---|---|
| **उत्कृष्ट नाट्य प्रयोग** | ३०,०००/- | २५,०००/- | २०,०००/- | ७५,०००/- |
| उत्तेजनार्थ २ रु.१०,०००/- प्रमाणे दोन | - | - | - | २०,०००/- |
| **उत्कृष्ट अभिनय पुरूष** | ३,०००/- | २,५००/- | २,०००/- | ७,५००/- |
| उत्तेजनार्थ १० बक्षीस रु.१,५००/- प्रमाणे | - | - | - | १५,०००/- |
| **उत्कृष्ट अभिनय महिला** | ३,०००/- | २,५००/- | २,०००/- | ७,५००/- |
| उत्तेजनार्थ ५ बक्षीस रु.१,५००/- प्रमाणे | - | - | - | ७,५००/- |
| उत्कृष्ट दिग्दर्शन | ५,०००/- | ३,०००/- | २,०००/- | १०,०००/- |
| उत्कृष्ट नेपथ्य | २,५००/- | २,०००/- | १,५००/- | ६,०००/- |
| उत्कृष्ट पार्श्वसंगित | २,५००/- | २,०००/- | १,५००/- | ६,०००/- |
| उत्कृष्ट प्रकाशयोजना | २,५००/- | २,०००/- | १,५००/- | ६,०००/- |
| उत्कृष्ट नाट्य लेखन | २,५००/- | २,०००/- | १,५००/- | ६,०००/- |
| विजेत्या संघास स्मृतीचिन्ह | २,०००/- | १,५००/- | १०००/- | ४,५००/- |
| उत्तेजनार्थ दोन संघासाठी ट्रॉफी प्रत्येकी रु.५००/- प्रमाणे | | | | १,०००/- |
| सादरीकरण खर्च रु.७,५००/- प्रमाणे | | | | प्रत्यक्ष |
| प्रति परिक्षक प्रतिदिनी रु.१,०००/-प्रमाणे एकूण ५ परिक्षक (प्रवासखर्चासह मानधन) | | | | प्रत्यक्ष |

नाटय महोत्सवास या वर्षी अधिकाधिक आस्थापनांनी आपल्या प्रवेशिका सादर कराव्यात यासाठी मंडळाच्या सर्व विभागातील/गटातील अधिकारी व कर्मचारी यांनी कसोशीने प्रयत्न करावेत. मध्यवर्ती कार्यालयाने या परिपत्रकासोबत जोडुन दिलेल्या नमुना फॉर्म नुसारच नाट्य संस्थेकडून प्रवेशिका स्विकारण्यात याव्यात. विभागस्तरावर फॉर्मच्या प्रती काढाव्यात आणि त्या आपल्या परिसरातील औद्योगिक व व्यावसायिक आस्थापनांच्या नाट्यसंघाना द्याव्यात. तसेच त्यांना या नाट्य महोत्सवाबाबत जास्तीत जास्त माहिती द्यावी. मंडळाच्या या नाट्य महोत्सवात प्रत्येक विभागीय कार्यालयाकडून कमीत कमी तीन व जास्तीत जास्त पाच प्रवेशिका मध्यवर्ती कार्यालयाकडे प्राप्त होणे बंधनकारक राहील.

आस्थापनेकडुन प्राप्त होणाऱ्या नाट्य संघाच्या प्रवेशिका ह्या नजिकच्या कामगार कल्याण केंद्रात प्रवेश फी व अनामत रक्कम भरून स्विकाराव्यात. विभागात प्राप्त होणाऱ्या सर्व प्रवेशिका छाननी करून एकत्रित संच तयार करून अभिप्रायासह मध्यवर्ती कार्यालयातील कार्यक्रम शाखेस पाठवाव्यात. मध्यवर्ती कार्यालयात प्राप्त होणाऱ्या प्रवेशिकेनुसार नाट्य महोत्सवाचे वेळापत्रक तयार करण्यात येईल. वेळापत्रक तयार झाल्यानंतर सर्व सहभागी झालेल्या नाट्य संघाना व मंडळाच्या कार्यालयांना कळविण्यात येईल.

तरी सर्व विभाग / गट व केंद्र प्रमुखांनी आपल्या केंद्र व कार्यालयाच्या परिसरात १६ व्या औद्योगिक व व्यावसायिक नाट्य स्पर्धेची प्रसिद्धी व प्रचार करून स्पर्धा बाबतची माहिती देऊन जास्तीत जास्त प्रवेशिका मिळवून स्पर्धा यशस्वी करावी.

सोबत :- प्रवेशिका नमुना

**कल्याण आयुक्त**

प्रत -

१) उप कल्याण आयुक्त,(लेखा लेखापरीक्षा/कार्यक्रम/प्रशासन), मध्यवर्ती कार्यालय,मुंबई
२) लेखा व लेखा परिक्षा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई
३) प्रसिद्धी व जनसंपर्क अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई
४) सहायक कल्याण आयुक्त, विभागीय कार्यालय,मुंबई
५) प्र.सहायक कल्याण आयुक्त, विभागीय कार्यालय,ठाणे/नाशिक/पूणे/छत्रपती संभाजीनगर/नागपूर/अकोला
६) सहायक लेखा अधिकारी, सर्व विभागीय कार्यालये.
७) कामगार विकास अधिकारी, कामगार क्रीडा भवन,मुंबई /नागपुर/पुणे
८) कामगार कल्याण अधिकारी (सर्व गट कार्यालये).★★★
९) सर्व केंद्र प्रमुख

★★★ यांनी सदरचे परिपत्रक केंद्र प्रमुखांना उपलब्ध करुन द्यावे.

# <u>महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ</u>

## १६ वा औद्योगिक व व्यावसायिक कामगारांसाठी नाट्य महोत्सव २०२५-२६

### <u>प्रवेशिका</u>

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | व्यवस्थापनेचे संपूर्ण नांव | | | |
| २ | संपूर्ण पत्ता | | | |
| ३ | दूरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी क्रमांक | | | |
| | व्यवस्थापनेचा ई-मेल | | | |
| ४ | संस्थेच्या स्थापनेची तारीख | | | |
| ५ | संस्था सादर करु इच्छिणा-या नाटकाचे नांव (पसंतीच्या क्रमानुसार) | नाटकाचे नांव | लेखक | |
| | | १. | | |
| | | २. | | |
| | | ३. | | |
| ६ | नाटकाचा वर्ग<br>ऐतिहासिक/सामाजिक/इतर | | | |
| ७ | दिग्दर्शकाचे संपूर्ण नांव<br>भ्रमणध्वनी क्रमांक | | | |
| ८ | नेपथ्यकाराचे संपूर्ण नांव<br>भ्रमणध्वनी क्रमांक | | | |
| ९ | मध्यांतर वगळून नाटकास लागणारा वेळ | | | |
| १० | अ) मध्यांतरास लागणारा एकूण वेळ | | | |
| | ब) एकूण मध्यांतर किती | | | |
| ११ | नाटकाची प्रवेशिका सादर करण्यापूर्वी नाटकाच्या किती तालमी झाल्या ? | | | |
| १२ | नाटकाची किंवा हस्तलिखिताची प्रत जोडली आहे का ? | होय | नाही | |
| १३ | लेखकाच्या संमतीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित नक्कल प्रत जोडली आहे का ? | होय | नाही | |
| १४ | रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे प्रमाणपत्र जोडले आहे काय ?<br>(सेन्सॉर सर्टिफिकेट) | होय | नाही | |
| १५ | प्रवेश शुल्क भरणा केल्याचा पावती व झेरॉक्स प्रत | क्रमांक | ठिकाण<br>गट / विभाग | दिनांक |
| १६ | मागील वर्षी व्यवस्थापनाकडून मंडळाच्या १५ व्या नाट्य महोत्सवात सहभागी होता का ? | | | |

**१७) भूमिकांची माहिती**

| अ.क्र. | हौशी कलावंताचे संपूर्ण नांव | भ्रमणध्वनी | भूमिका | कलावंताचा व्यवसाय | का.क.निधी भरणा केल्याचा तपशिल. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४ | | | | | |
| ५. | | | | | |
| ६. | | | | | |
| ७. | | | | | |
| ८. | | | | | |
| ९. | | | | | |
| १०. | | | | | |
| ११. | | | | | |
| १२. | | | | | |
| १३. | | | | | |
| १४. | | | | | |
| १५. | | | | | |
| १६. | | | | | |
| १७. | | | | | |
| १८. | | | | | |
| १९. | | | | | |
| २०. | | | | | |

१८) वरील नाटकात भूमिका करणारे कलाकार ( मुंबई कामगार कल्याण निधी कायदा१९५३ च्या कलम २ (२ ) नुसार कामगार/कर्मचारी या व्याख्येत बसतात कां ? होय / नाही
(कलम (२) ची टिप : कामगार/कर्मचारी म्हणजे एखाद्या व्यापारी संस्थेत कोणतेही काम करण्यासाठी मग तो कुशल किंवा अकुशल असो, शारिरीक श्रमाचे किंवा लिपिकाचे काम असो, मजूरीने किंवा बक्षिस देऊन कामावर लागलेली कोणतीही व्यक्ती )

१९) मागीलवर्षी (१५ व्या ) औद्योगिक कामगार नाट्य स्पर्धेत आपल्या व्यवस्थापनेने सहभाग घेतला होता का ? होय / नाही

२०) औद्योगिक कामगारानी सादर केलेले नाटकापैकी एखाद्या नाटकास महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या स्पर्धेत पूर्वी बक्षिस मिळालेले आहे काय ? मिळाले असल्यास खालील प्रमाणे माहिती द्यावी.

| अ.क्र | नाटकाचे नांव | वर्ष | प्राथमिक/अंतिम | स्पर्धा क्रमाक |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

२१) आवश्यक वाटल्यास संस्थेची अधिक माहिती आवेदन पत्राला वेगळी जोडून पाठविण्यात यावी.

**प ति ज्ञा**

असे प्रतिज्ञापत्र लिहून देतो की, आम्ही वर दिलेली माहिती खरी व बरोबर आहे. आम्हास नियम व अटी माहित आहेत व त्या मान्य आहेत. आमच्या नाटकाची निवड झाल्यास १६ व्या औद्योगिक व व्यावसायिक नाट्य महोत्सवात आपण ठरविलेल्या अटीवर व दिलेल्या तारखेस नाटक सादर करु अशी आम्ही कबूली देतो.

व्यवस्थापकाची सही : नाट्यसंघ प्रमुखाची सही :

दिनांक :

व्यवस्थापनेचे नांव : -----------------------------------------------------------------

उपरोक्त नाटक -------------------------------------------------------------
स्पर्धेच्या नियम व अटीनुसार खात्री करुन देण्यांत येऊन १६ व्या औद्योगिक व व्यावसायिक कामगारांसाठी नाटय महोत्सवाच्या स्पर्धेत प्रवेश देण्यात यावा.

कामगार कल्याण अधिकारी

उपरोक्त केंद्राचे (नाव --------------------------) नाटक------------------------
स्पर्धेच्या नियम व अटीनुसार खात्री करुन देण्यांत येऊन १६ व्या औद्योगिक व व्यावसायिक कामगारांसाठी नाटय महोत्सवाच्या स्पर्धेत प्रवेश देण्यांत आला आहे .

सहाय्यक कल्याण आयुक्त/प्र.सहाय्यक कल्याण आयुक्त.